# कृषि उत्पन्न बाजार समिती, औसा

ता.औसा जिल्हा लातूर ०२३८३-२२२०६३ Email-am_ausa@msamb.com

**चंद्रशेखर सोनवणे** सभापती | **भिमाशंकरप्पा राचट्टे** उपसभापती | **संतोष हुच्चे** सचिव

website- www.apmcausa.com

**कृषि उत्पन्न बाजार समिती,औसा ता.औसा , जि. लातूर,**

**पाहिजे**

कृषि उत्पन्न बाजार समिती औसा मध्ये वार्षीक मानधन तत्वावर **कर सल्लागार (Tax Consultant)** नियुक्त करावयाचा आहे . त्यासाठी पात्र व्यक्तीकडून विहीत नमुण्यात दिनांक /०२/२०२४ पर्यंत अर्ज माग विण्यात येत आहेत अर्जाचा नमुना वनि युक्ती च्या अटी व शर्ती www.apmcausa.com या संकेत स्थळावर व कृषि उत्पन्न बाजार समिती , औसा च्या कार्यालया येथे पाहण्यास उपलब्ध आहेत.

**स्वा/- स्वा/- स्वा/-**

**सभापती उपसभापती सचिव**

**कृषी उत्पन्न बाजार समिती औसा ता.औसा जि लातूर**

Scanned with CamScanner

दिनांक / /२०२४

प्रति,

मा. सभापती / सचिव सो.

कृषि उत्पन्न बाजार समिती,औसा ता.औसा , जि. लातूर,

**विषय :- कर सल्लागार पदाच्या नियुक्तीसाठी अर्ज.**

**संदर्भ :- दिनांक / /२०२४ रोजीचे दै. या वर्तमानपत्रातील प्रसिध्द झालेली जाहिरात.**

**महोदय,**

कारणे विनंती अर्ज करतो / करते कि, संदर्भात नमुद जाहिरातीला अनुसरून मी **कर सल्लागार** पदासाठी अर्ज करीत आहे. मी कृषि उत्पन्न बाजार समिती, औसा ता.औसा ,जि.लातूर,साठी काम करण्यास इच्छूक आहे. सदर कामाचा मला पुरेसा अनुभव आहे. तरी माझ्या अर्जाचा सहानूभूतीपूर्वक विचार करून मला सेवा करण्याची संधी द्यावी ही विनंती.

**माझी वैयक्तीक माहिती खालील प्रमाणे**

१) पुर्ण नाव -------- ------------------------------------------------------------

२) फर्मचे नाव -------- ------------------------------------------------------------

३) पूर्ण पत्ता -------- ------------------------------------------------------------

४) संपर्क क्रमांक ------ --------------------------- वय : -----------------------------------

५) जन्मतारीख व वय -------- ------------------------------------------------------------

६) शैक्षणिक पात्रता -------- ------------------------------------------------------------

७) कामाचा अनुभव -------- ------------------------------------------------------------

८) वार्षीक मानधनाची अपेक्षा -------- ------------------------------------------------------------

तरी वरील प्रमाणे माझी सर्व माहिती खरी व बरोबर आहे . सदर नियुक्ती बाबतच्या जाहिरातीतील आणि अर्जासोबतच्या अटी व शर्तीनुसार मी या पदास पात्र आहे . मी सदर अटी व शर्ती वाचलेल्या असून त्या मला मान्य आहेत . तरी माझ्या अर्जाचा सहानभुतीपूर्वक विचार करुन कर सल्लागार या पदावर काम करण्याची संधी मला दयावी , ही नम्र विनंती.

आपला विश्वासू

( पूर्ण नांव , स्वाक्षरी व फर्मचा शिक्का )

**सोबत खालील कागदपत्राच्या सत्यप्रती जोडलेल्या आहेत.**

१) शैक्षणिक प्रमाण पत्रे .
२) सनदी लेखापाल पदवी व नोंदणी प्रमाणपत्र.
३) आधार कार्ड / पॅन कार्ड .
४) इतर कागदपत्रे .

Scanned with CamScanner

# कृषि उत्पन्न बाजार समिती औसा

## अटी व शर्ती (जाहिरात दि.    /    /२०२४).

१. अर्जदाराचे वय कमाल ६५ वर्षा पेक्षा जास्त नसावे.

२. पात्रता.

(अ) अर्जदार सनदी लेखापाल (Chartered Accountant) असावा.

(ब) अर्जदारास शासनाच्या प्रचलित कर कायदे, Income Tax नियम, VAT कायदा, वस्तू व सेवा कर नियम (GST), ताळेबंद, नफा-तोटा पत्रक तसेच अंतर्गत लेखा परिक्षणाचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे.

(क) अर्जदारास संगणक ज्ञान, MSCIT, MS Tally इत्यादीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

(ड) अर्जदारास कमीत कमी पाच वर्षांचा संबंधित कामाचा व आयकर परतावा भरण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

३. सदर पदावरील पात्र उमेदवाराची निवडा करण्याचा अधिकार हा बाजार समितीला राहील.

४. सदर भरतीसाठी कोणत्याही प्रकारचे आरक्षण लागू नाही.

५. उमेदवारास मुलाखतीवेळी आवश्यक ती मुळ कागदपत्रे व त्यांच्या सांक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक राहील.

६. अर्जासोबत आपल्या नावे कोणताही गुन्हा दाखल नसलेबाबत संबंधीत पोलीस स्टेशनचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

७. सदरची नियुक्ती ही एक वर्षासाठी वार्षीक मानधन तत्वावर करण्यात येईल.तसेच दर तीन महिन्यानी कामातील प्रगती आणि कामाची गरज विचारात घेवून नियुक्ती पुढे चालू ठेवणे बाबत विचार करण्यात येईल.

८. एक वर्ष पुर्ण झालेनंतर कामातील प्रगती आणि कामाची गरज विचारात घेवून, संबंधितांकडून योग्य अटी व शर्तीचे बंधपत्र घेवून, त्यांची नियुक्ती पुढे चालू ठेवणेबाबत विचार करण्यात येईल.

९. सदर नियुक्तीद्वारे समितीकडे कायम स्वरुपी नोकरी मागण्याचा कोणताही अधिकार उमेदवारास राहणार नाही.

१०. वार्षीक मानधन देण्यात येईल व नियुक्तीच्या पहिल्या वर्षात मानधनामध्ये वाढ देण्यात येणार नाही. तसेच मानधना व्यतिरिक्त इतर कोणतेही लाभ अथवा भत्ते लागू होणार नाहीत.

११. काम मध्येच सोडावयाचे असल्यास तशी एक महिना अगोदर नोटीस देणे आवश्यक राहील, अचानक काम सोडता येणार नाही. अचानक काम सोडणेस एक महिन्याचे मानधन जमा करावे लागेल.

१२. कामाची प्रगती व वर्तन असमाधानकारक असल्यास तात्काळ कामावरुन कमी करण्याचा अधिकार बाजार समिती, औसा यांना राहील.

१३. प्रशासकीय व अन्य कारणास्तव सदरची भरती प्रक्रिया कोणत्याही स्तरावर स्थगित अथवा रद्द करण्याचा बाजार समितीने राखून ठेवला आहे.

१४. निवड झाल्यास नेमणुकीच्या अटी व शर्ती मान्य असलेबाबत रु.१००/- च्या स्टॅप पेपरवर तहसीलदार यांचे समोर    सादर केलेले प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

१६. **कामकाजाचे स्वरूप :-**

(१) बाजार समितीच्या सर्व विभागांचे अंतर्गत लेखापरिक्षण करणे व लेखापरिक्षणातील आक्षेपांची पूर्तता करणे.

(२) बाजार समितीचे वार्षिक आयकर रिटर्न भरून आयकर विभागाकडे दाखल करणे.

(३) व्यवसाय कर रिटर्न भरून आयकर विभागाकडे दाखल करणे.

(४) वस्तू व सेवा कर नियम (GST) नियमानुसार मंदिरे समितीचे रिटर्न विहित नमुन्यात ऑनलाईन दाखल करणे.

(५) शासनाच्या प्रचलित सर्व कर कायद्यानुसार मंदिर समितीच्या विविध साहित्य व सेवांची खरेदी /विक्रीच्या    करविषयक कामाबाबत योग्य कार्यवाही करणे.

(६) समितीचा वार्षिक ताळेबंद (Balance Sheet) व नफा- तोटा पत्रक तयार करणे.

(७) आयकर विभाग तसेच सेवा कर विभागाकडून येणाऱ्या आक्षेपांची पूर्तता करणे व सदर आक्षेप तातडीने निकाली काढण्यासाठी पत्र व्यवहार करणे.

(८) "बाजार समिती अधिनियम, १९६३" मधील तरतुदीनुसार आवश्यक आर्थिक बाबी विषयक कार्यवाही करणे.

(९) कृषि उत्पन्न बाजार समिती,औसा मार्फत वेळोवेळी सोपविण्यात येणारी कर विषयक जबाबदारी पार पाडणे.

Scanned with CamScanner